## निवडक

### हरभऱ्याच्या गंजीला आग

**नांदेड** : हिमायतनगर तालुक्यातील डोल्हारी येथील शेतकऱ्याच्या शेतातील जमा केलेल्या हरभऱ्याच्या ढिगाऱ्याला कुणीतरी अज्ञाताने आग लावली आहे. ही घटना बुधवारी पहाटेदरम्यान घडली. यात शेतकरी दिनेश पांडुरंग कदम यांचे दीड लाखाचे नुकसान झाले आहे. पैनगंगा नदीकाठावर असलेल्या मौजे डोल्हारी येथील शेतकरी दिनेश पांडुरंग कदम यांनी नुकताच शेतातील दोन एकर रानातील हरभरा काढून ढग लावला होता. दरम्यान, शेतातील हरभऱ्याचा जमा केलेल्या ढिगाला बुधवारी रात्री कुणी अज्ञाताने जाणीवपूर्वक आग लावून गंजी जाळून टाकली. यामुळे शेतकऱ्याचे जवळपास २० ते २५ क्विंटल होणारा हरभरा जळून खाक झाला आहे.

### एक्स्पर्ट लाईव्ह इंडिया परिषदेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर** : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने एक्स्पर्ट लाईव्ह इंडिया परिषदेचे विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या एक दिवसीय परिषदेत स्विझर्लंडवरून आलेले विषयतज्ज्ञ स्टोयन चालकोव, एक्स्पर्ट लाईव्ह इंडियाचे संस्थापक समीर म्हैसकर, क्लाऊड ड्रिव्हन सिनियर सॉफ्टवेयर इंजिनियर सौरभ म्हैसकर, क्लाऊड सोल्युशन आर्किटेक्ट ललित रावत, डेन्मार्कवरून आलेले मॉर्टेन नूडसेन आणि कॅरोलिन वॉलटोर्प आदि तज्ज्ञ मान्यवरांनी आर्टिफिशियल इंटेलिजियन्स आणि तंत्रज्ञानाशी निगडीत असलेल्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, संचालिका डॉ. परमिंदर कौर, विभागप्रमुख प्रा. पियुष काळे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे जीवन प्रेरणादायी


## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

## कर्मवीर भाऊराव पाटील रयत विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात

**कराड** : कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण आणि सामाजिक उन्नतीचे कार्य पिढ्यांपिढ्यासाठी प्रेरणादायी आहे. रयत शिक्षण संस्था त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचा दाखला देते. त्यांनी ग्रामीण भागातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या वंचित जनतेच्या शिक्षणासाठी आपले जीवन समर्पित केले, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

### चार वर्षात विद्यापीठाची उल्लेखनीय प्रगती

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ हे अलिकडेच सन २०२१ मध्ये स्थापन झालेले विद्यापीठ आहे. पण या ४ वर्षाच्या काळात या विद्यापीठाने उल्लेखनीय प्रगती केली आहे, असे सांगून राज्यपालांनी विद्यापीठाचा परिसर स्वच्छ आणि सुव्यस्थित ठेवल्याबद्दल कौतुक केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियान सुरू केलेले आहे. ते सुरू करताना भारताला सर्वात स्वच्छ, सुव्यस्थित आणि हरित देश बनविण्याचे स्वप्न त्यांच्या उराशी होते. हे लक्षात ठेवून आपणही त्यामध्ये योगदान दिले पाहिजे, असे सांगितले.



विविध विद्याशाखांमध्ये उत्कृष्ट गुण मिळविलेल्या तीन स्नातकांना प्रत्यक्ष समारंभात राज्यपाल यांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. यानंतर सर्वोत्कृष्ट गुण मिळविलेल्या ३१ स्नातकांना पदवी देण्यात आली. पदवी परीक्षेत ६७९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांच्या अर्जांनुसार पदवी देण्याची व्यवस्था विद्यापीठाने केली आहे.
- कुलगुरू डॉ. मस्के

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील रयत विद्यापीठाचा (राज्य सार्वजनिक विद्यापीठ) प्रथम दीक्षांत समारंभ राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत बुधवारी रोजी साताऱ्यातील छ. शिवाजी महाराज कॉलेज येथे पार पडला, यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलाधिकारी चंद्रकांत दळवी, कुलगुरु डॉ. ज्ञानदेव मस्के, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक डॉ. हेमंत उमाप, कुलसचिव डॉ. विजय कुंभार आदी उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, शिक्षण आणि जीवन व्यवहारांचा समन्वय असणे आवश्यक आहे. जगाच्या बाजारपेठेत यशस्वी होण्यासाठी जे आवश्यक आहे त्याचा शिक्षणामध्ये अंतर्भाव असणे आवश्यक आहे. हा समन्वय साधण्याच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण महत्त्वाचे आहे. याचा विचार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आणि विद्यापीठांमध्ये दिले जाणारे शिक्षण हे जगाच्या बाजारात टिकणारे असले पाहिजे, या दृष्टीने शैक्षणिक धोरण विकसित केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा त्यांच्या सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणासाठीच्या चिकाटीच्या बांधिलकीत आहे. शिक्षणाद्वारे वंचितांना सक्षम बनविणे, त्यांना चांगले जीवन जगण्यास सक्षम करणे यावर त्यांचा विश्वास होता, असे सांगून राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, आज आपण एकता, बंधुता, सामाजिक न्याय यावंर चर्चा करतो पण याची सुरुवात छत्रपती शिवाजी व संभाजी महाराज यांनी केली. जाती, धर्माच्या आधारावर आपण माणसा-माणसात भेद करू शकत नाही.



# भूमिपुत्रांवर अन्याय न होता विकास हीच शासनाची भूमिका

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन

**भाईंदर** : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) माध्यमातून ठाणे आणि मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये सुरू असलेल्या विकासकामांमध्ये बाधित होणाऱ्या भूमिपुत्रांवर अन्याय होऊ न देता विकास केला जाईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून होत असलेल्या विविध विकास कामाच्या आढावा बैठकीप्रसंगी बोलत होते. या बैठकीमध्ये मोघरपाडा कार डेपोमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा झाली. तसेच गायमुख ते फाऊंटन व गायमुख ते दहिसर चेक नाका दरम्यान होणाऱ्या ६० मीटर लांबीच्या रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या बरोबर देखील प्रशासनाने चर्चा केली.

# उल्हासनगरमध्ये ११.९४ लाखांच्या ड्रग्ससह दोघांना अटक

**उल्हासनगर** : रात्रीच्या वेळी साईबाबा मंदिराजवळ दोन युवक मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्सचा सौदा करणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच मध्यवर्ती पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने वॉच ठेवला. योग्य वेळी छापा टाकत पोलिसांनी तब्बल ५८.१ ग्रॅम एमडी ड्रग्ससह दोन आरोपींना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्सची बाजारातील किंमत तब्बल ११ लाख ९४ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या मोठ्या कारवाईमुळे शहरात ड्रग्स तस्करीचा पर्दाफाश झाला असून, पुढील तपासात मोठे गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे.



पोलीस हवालदार अमोल देसाई यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सोमवारी रात्रीच्या सुमारास उल्हासनगर-२ मधील साईबाबा मंदिराजवळ दोन युवक एमडी ड्रग्सचा सौदा करण्यासाठी येणार आहेत. पोलिसांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना या प्रकरणाची माहिती दिली आणि विशेष पथक तयार करण्यात आले. योग्यवेळी सापळा रचून पोलिसांनी दिलेल्या ठिकाणी दबा धरला. काही वेळातच संशयास्पद हालचाली दिसू लागल्या. पोलिसांनी त्या दोघांना घेरले आणि झडती घेतली असता त्यांच्याकडून ५८.१ ग्रॅम एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींची ओळख आरिफ मोहम्मद शरीफ खान (२१) आणि सफिकुर रेहमान सिराज अहमद खान (२२) अशी करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. यावेळी चौकशीतून आणखी काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे.

## आरोग्य कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

**जव्हार** : पालघर जिल्ह्यातील ५० आरोग्य सफाई कामगारांच्या माध्यमातून विविध मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी कामगारांनी काम बंद आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. दरम्यान, जिल्हा भरात हे कंत्राटी कामगार गेल्या २५ वर्षांपासून सेवा देत आहेत, ही कामे करताना या कामगारांना अत्यल्प मानधन दिले जात आहे, वास्तविक पाहता हे मानधन शासनाच्या धोरणानुसार ११ हजार ३३२ रुपये इतके आहे, मात्र प्रत्यक्षात या कामगारांना केवळ ८ हजार रुपयेच मानधन देण्यात येत असल्याचे या आंदोलक कर्मचाऱ्यांनी माहिती दिली. शिवाय, समान काम समान वेतन, शासनाचे विविध लाभ मिळावे, वेळेवर मानधन मिळावे असे काही महत्त्वाच्या मागण्या आंदोलकांनी केल्या आहेत.

# नवी मुंबईत सात बांगलादेशी नागरिक अटकेत

## बांगलादेशी नागरिकांनी आधार कार्ड, पॅनकार्ड बनवून घेतल्याचे उघड

**नवी मुंबई** : उरण पोलिसांनी सोमवारी दुपारी उरणच्या द्रोणागिरी नोडमध्ये नवीन बांधकाम सुरू असलेल्या गामी कन्स्ट्रक्शनच्या बांधकाम साईटवर छापा मारून मागील काही वर्षापासून भारतात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या ७ बांगलादेशींना नागरिकांना अटक केली आहे. या सातही बांगलादेशी नागरिकांनी भारतील ओळखीचा पुरावा असलेले आधार कार्ड, पॅनकार्ड व इतर कागदपत्रे बनवून घेतल्याचे उघडकीस आहे.

नवी मुंबई पोलिसांनी गत महिनाभरापासून बेकायदेशीर वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांची धरपकड करण्यास सुरुवात केली आहे. उरणच्या द्रोणागीरीमधील गामी कन्स्ट्रक्शनच्या इमारतीच्या बांधकाम साईटवर बांगलादेशी नागरिक काम करत असल्याचे व ते त्याचठिकाणी राहत असल्याची माहिती उरण पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने दुपारी द्रोणागिरीमधील गामी कन्स्ट्रक्शनच्या बांधकाम साईटवर सोमवारी दुपारी छापा मारला.

यावेळी पोलिसांनी सदर बांधकाम साईटवरील कामगारांची तपासणी केली असता, त्यातील ७ कामगार हे बांगलादेशी नागरिक असल्याचे उघडकीस आले. सर्व बांगलादेशी नागरिक घुसखोरीच्या मार्गाने भारतात आल्याचे व मागील ७ ते ८ वर्षांपासून भारतात वेगवेगवेळ्या ठिकाणी मजुरी करून राहत असल्याचे त्यांच्या चौकशीत आढळून आले आहे. तसेच त्यांनी बनावट कागदपत्राद्वारे भारतातील ओळखपत्र आधारकार्ड व पॅन कार्ड आढळून आले. पोलिसांनी त्यांच्याजवळ असलेले आधारकार्ड व पॅनकार्ड जप्त करून पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

# 'स्मॅक'चे सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण

**कोल्हापूर** : 'स्मॅक' तर्फे सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आयोजित केल्या जाणाऱ्या विविध सभा, कार्यक्रम व उपक्रमांबाबत विचारविनिमय करण्याकरिता सुवर्णमहोत्सव समिती व निमंत्रित सदस्यांची नेमणूक करण्यात आली.

बुधवारी या सदस्यांची पहिली बैठक स्मॅक भवनमध्ये पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थांनी स्मॅक सुवर्णमहोत्सव समितीचे चेअरमन सुरेन्द्र जैन होते. सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या अनुषंगाने इंजिनीअरिंग असोसिएशन, स्मॅक, गोशिमा, मॅक, मुंबई उच्च न्यायालय कोल्हापूर खंडपीठ कृती समिती आणि कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशन, कोल्हापूर मेडिकल असोसिएशन, कोल्हापूर जिल्हा स्पोर्ट्स असोसिएशन, आयटी असोसिएशन, हॉटेल मालक संघटना एकत्र येऊन कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाकरिता 'कोल्हापूर फर्स्ट' या संकल्पनेतून कोल्हापूरच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने छत्रपती शाहूंच्या विचारांचा वारसा लाभलेल्या, धार्मिक, राजकीय, ऐतिहासिक आणि उद्योग, व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूरकरांनी विविध क्षेत्रांमध्ये, आपल्या विविध कला गुणांद्वारे परिश्रमपूर्वक अनेक बाबी निर्माण केल्या त्या जगप्रसिद्ध आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन येणाऱ्या कालावधीत खालील विकासाची कामे करण्यासाठी कोल्हापूर फर्स्ट सर्वार्थाने काम करणार आहे.



कोल्हापूर मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे परिक्रमा खंडपीठ स्थापन होणे, महाराष्ट्र राज्याचा ९ वा विभाग म्हणून कोल्हापूर विभागाची स्थापना होऊन आयुक्तालयासह सर्व विभागीय शासकीय कार्यालयांची स्थापना व्हावी. तसेच कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत सर्व औद्योगिक असोसिएशन्सचे फेडरेशन स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे. या अनुषंगाने सुवर्णमहोत्सवी वर्षांमध्ये सर्व संघटनांच्या वतीने मुख्यमंत्री यांना कोल्हापूरमध्ये आमंत्रित करून मेळाव्याचे आयोजन केले जाईल, तसेच उद्योग मंत्री, विविध शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये उद्योग परिषद आयोजित केली जाईल.

बैठकीला स्मॅकचे माजी चेअरमन पद्माकर सप्रे, आर. बी. थोरात, मॅकचे अध्यक्ष मोहन कुशिरे, आयआयएफचे अध्यक्ष विनय खोबरे, सीआयआयचे उपाध्यक्ष सारंग जाधव, कोल्हापूर डिस्ट्रिक्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष सर्जेराव खोत प्रमुख उपस्थित होते.

# माजी आमदार गिल्बर्ट मेंडोसासह तीन नगरसेवक शिवसेनेत

**भाईंदर** : मीरा-भाईंदरमधील माजी आमदार गिल्बर्ट मेंडोसासह माजी नगरसेविका शर्मिला बगाजी, माजी नगरसेवक बर्नड डिमेलो व गोविंद जॉर्जी यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची साथ सोडली. त्यांना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते प्रवेश देण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत मेंडोसासह उत्तनचे तिन्ही माजी नगरसेवकांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. तसेच शिवसेना मुख्य नेते व



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत काही दिवसांमध्ये भव्यदिव्य पक्षप्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे, त्यावेळी उत्तनसह भाईंदरमधील तमाम नागरिकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश कार्यक्रम होणार असल्याची माहिती सरनाईक यांनी दिली आहे.

# वाळूज येथे रंगणार ४४वे मराठवाडा साहित्य संमेलन

## दोन दिवस साहित्य रसिकांना भरगच्च साहित्य मेजवानी

**सुजीत ताजणे/छत्रपती संभाजीनगर**

विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख महाविद्यालय (रौप्य महोत्सवी वर्ष २०२५) तर्फे मराठवाडा साहित्य परिषदेच्या ४४ वे मराठवाडा साहित्य संमेलनाचे आयोजन वाळूज येथील विलासराव देशमुख साहित्यनगरी, दगडोजीराव देशमुख महाविद्यालय बजाजनगर येथे दि. १५ व १६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. संमेलनामध्ये साहित्य रसिकांसाठी विविध साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. भीमराव वाघचौरे हे संमेलनाध्यक्ष तर विजय राऊत हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असणार आहेत.

शनिवारी दि. १५ रोजी सकाळी १०.३० ते १.०० या वेळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विचारपीठावर संमेलनाध्यक्ष डॉ. भीमराव वाघचरि (सुप्रसिद्ध कादंबरीकार) यांच्या प्रमुख उपस्थितीत आ. उदय सामंत यांच्या हस्ते संमेलनाचे उदघाटन होईल. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आ. संजय शिरसाट, आ. अतुल सावे, आ. अमित विलासराव देशमुख हे मान्यवर उपस्थित राहतील. उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान इंगळे हे करतील तर आभार प्राचार्य डॉ. राहुल हजारे हे मानतील. तत्पूर्वी शनिवारी ग्रंथदिंडी काढण्यात येईल. उद्घाटक म्हणून चेतन राऊत (अध्यय, मासिआ) हे असतील. सकाळी १० वाजता डॉ. कदम (संमेलनाध्यक्ष, ४३ वे मराठवाडा साहित्य संमेलन, गंगापूर) यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शन उदघाटन होईल.




# पोलिसांनी टाकलेल्या दरोड्यातील ६ आरोपी अटकेत



**अलिबाग** : अलिबाग-पेण मार्गावरील तीनवीरा धरणाजवळ दरोडा टाकण्यात आला होता. यामध्ये दीड कोटी रुपयांचा मुद्देमाल घेऊन दरोडेखोर पसार झाले. हा दरोडा कुणी टाकला हा प्रश्न पोलिसांसमोर होता. पोलिसांनी तपासाची चक्र फिरवली. त्यावेळी जी माहिती पोलिसांच्या हाती लागली त्यावरून त्यांनाही धक्का बसला. त्याचे कारण म्हणजे हा दरोडा टाकणारे दुसरे तिसरे कोणी नव्हे तर पोलिसच असल्याचे तपासात समोर आले.

या दरोड्यातील तीन पोलीस रायगड पोलीस दलात कार्यरत होते. या प्रकरणातला आरोपी समाधान पिंजारीने नागपूरमधल्या नामदेव हुलगे यांच्याशी संपर्क साधून आपल्या मित्राच्या मदतीने ७ किलो सोने अवघ्या ५ कोटी रुपयांमध्ये विकण्याचा सौदा केला. सोने खरेदी करण्याच्या उद्देशाने हुलगे हे १ कोटी ५० लाख रुपये घेऊन निघाले. त्यावेळी त्यांच्यासोबत चालक दीप गायकवाड आणि इतर मंडळी होते. ते एका कारमधून अलिबागकडे निघाले. तिथे आलेल्या पोलिसांनी गाडीची झडती घ्यावी लागेल असे सांगितले. त्याचवेळी गाडीत असलेल्या दीप गायकवाडने कार पनवेलच्या दिशेने पळवली. हा सर्व कटाचा भाग होता. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या सूचनेनुसार या ६ जणांना अटक केली आहे.

**मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र.-३**
**वित्तीय मंत्रालय, भारत सरकार**
सेक्टर ३०ए, रघुलीला मॉलच्या पुढे, वाशी रेल्वे स्टेशनजवळ, वाशी नवी, मुंबई-४०० ७०३
**पुनर्प्राप्ती कार्यवाही क्र. ८२ सन २०१८**

**बँक ऑफ महाराष्ट्र** ...प्रमाणपत्र धारक
**विरूध्द**
**श्री. किरण हरी कांबळे आणि अन्य.** ...प्रमाणपत्र कर्जदार

**विक्रीची उद्घोषणा मांडण्याकरिता सूचना**

**सीडी १.श्री. किरण हरी कांबळे**
**सीडी २. श्रीमती. सविता किरण कांबळे**
I) **फ्लॅट क्र. ६०३,** ६वा मजला, श्री रघुनारायण इमारत, गणपती विसर्जन जवळ तलाव, एमआयडीसी रोड, गाव चोळे, डोंबिवली (ई), जिल्हा-ठाणे-४२१ २०१.
ii) खोली क्र. १, शिव शरण इमारत, मॉडेल स्कूल रोड, गांधी नगर, डोंबिवली(पू)-४२१२०१.
ज्याअर्थी सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी व्याज आणि खर्चासह **रु. २०,५४,६९१/- (रूपये वीस लाख चौप्पन हजार सहाशे एक्याणव मात्र)** ची रक्कम अर्जदार बँक/वित्तीय संस्थेला चुकती करण्यासाठी **ओ.ए. क्र. २४६ सन २०१६** मध्ये वसुली प्रमाणपत्र निर्गमित केले होते.
ज्याअर्थी तुम्ही सीडींनी रक्कम चुकती केलेली नाही आणि निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद मिळकत जप्त केली आणि तिच्या विक्रीचे आदेश दिले.
तुम्हाला याद्वारे कळविण्यात येते की, विक्रीची उद्घोषणा काढणे आणि तिच्या अटी मांडण्याकरिता **१०/०२/२०२५** ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. तुम्हाला उद्घोषणा मांडणीमध्ये सहभागी होण्याकरिता आणि सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाशी संबंधित कोणताही बोजा, प्रभार, दावे किंवा दायित्वे निम्नस्वाक्षरीकारांना कळविण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.

**स्थावर/जंगम मिळकतीचे वेळापत्रक**

फ्लॅट क्र. ६०३, सहावा मजला, श्री रघुनारायण इमारत, गणपती विसर्जन तलावाजवळ, एमआयडीसी रोड, गाव - चोळे, डोंबिवली (पू), जिल्हा - ठाणे -४२१२०१
सदर माझ्या हस्ते आणि न्यायधिकरणाच्या शिक्क्यासह **१४/१०/२०२५** रोजी दिले.

शिक्का
सही/-
**दीपा सुब्रमण्यम**
**वसुली अधिकारी-I**
**कर्ज वसुली न्यायाधिकरण-3**

**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
kotak Kotak Mahindra Bank
ऑनलाईन ई-लिलाव मत्तेची विक्री
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू), मुंबई-४०० ०५१
शाखा कार्यालय : कोटक महिंद्रा बँक लि., ५ वा मजला, अदमास प्लाझा, १६६/१६, सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पू), मुंबई ४०००९८

**स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत नियम ८(५) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदी अन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.**
फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड (यानंतर ''**एफआयएचएफसीएल**'' असे उल्लेखित) द्वारे कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या नावे कर्जाच्या अभिहस्तांकनला अनुसरून, कोटक महिंद्रा बँक लि. (यानंतर ''**बँक/केएमबीएल/तारण धनको**'') च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित खाली नमूद स्थावर मिळकत (यानंतर तारण मत्ता अशी उल्लेखित) जिचा प्रत्यक्ष कब्जा यांनी १२.०६.२०२४ रोजी घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सह-कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, **कर्ज खाते क्र. ६०१८०७२१०१६३६४९** अंतर्गत खालील तपशीलानुसार **श्री. आनंद सागर गुप्ता, श्री. फूलचंद सागरमल गुप्ता आणि मे. ऑर्बिट कॉर्पोरेशन** यांच्याद्वारे घेतलेले कर्ज, यांच्याकडून वसुलीपर्यंत भविष्यातील लागू व्याजासह ०७.०२.२०२५ रोजी प्रमाणे थकीत रु. ८२,०६,७१८/- **(रुपये ब्याऐंशी लाख सहा हजार सातशे अठरा मात्र)** या रकमेच्या वसुलीकरिता **''जे आहे जसे आहे'', ''जसे आहे तसे आहे'', ''जे काही आहे जसे आहे''** या तत्त्वावर सरफैसी अधिनियम २००२ च्या तरतुदी अंतर्गत ई-लिलावामार्फत तारण मत्तेची विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

| विषय तपशील | तपशील |
|---|---|
| लिलावाची तारीख | ०७.०३.२०२५ |
| लिलावाची वेळ | दु. १२:०० वा. ते दु. १:०० वा. दरम्यान सह ५ मिनिटांचा अमर्यादित विस्तार |
| राखीव किंमत | रु. ५२,००,०००/- (रुपये बावन्न लाख मात्र) |

इसारा अनामत रक्कम (ईएमडी) :- रू. ५,२०,००/- (रुपये पाच लाख वीस हजार मात्र)
केवायसी सह ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख :- ०६.०३.२०२५ सायं. ६:०० वा. (भाप्रवे) पर्यंत
**तारण मत्तेचे विवरण :-** डोंगरी पाडा, गाव कावेसर, तहशील आणि जिल्हा ठाणे (प) ४००६१५ येथे स्थित असलेले आणि वसलेले जमीन धारक सर्व्हे क्र. १४१, हिस्सा क्र. ६ वर बांधलेले मानस आनंद को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड नावे ज्ञात सोसायटी मध्ये मानस आनंद नावे ज्ञात इमारतीच्या ६ व्या मजल्यावर इमारत क्र. १ मिळकत धारक फ्लॅट क्र. ६०३, मोजमापित ६११ चौ.फू. बिल्टअप क्षेत्रचे सर्व ते भाग आणि विभाग.
**ज्ञात भार:-** १. सोसायटी मेंटेनन्स थकीत १० डिसें २०२४ रोजीस रु. १,८१,१८३/-, २. पालिका मिळकत कर रु. ५४,०००/-, महानगर गॅस थकीत रु. ४२००/ आणि इलेक्ट्रिसीटी थकीत १६००/-
तारण मत्ताच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत ॲक्टचे कलम १३ च्या पोट-कलम ८ च्या तरतुदीनुसार कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेनी कृपया नोंद घ्यावी की, जर सदर लिलाव हा कोणत्याही कारणास्तव अयशस्वी झाला तर तारण धनको हे खाजगी पद्धतीने द्वारा विक्रीच्या मार्गे सिक्युरिटी इंटरेस्टची अंमलबजावणी करतील. जर विक्री अन्वये मत्तेसंबंधीत कोणतेही स्पष्टीकरण/गरज असल्यास बोलीदारांनी आयव्हीआर क्र. (+९१-९१५२२१९७५१) वर संपर्क करावा. तसेच बोलीदार श्री. शांतानू नायसे (मोबा क्र. +९१७२०८०५०७३५) आणि श्री. अनुज बिसेन (+९१९७२६४१७२५०) येथे देखील संपर्क साधू शकतात. विक्रीच्या तपशिलवार अटी व शर्तीसाठी कृपया बँकेची वेबसाईट म्हणजेच www.kotak.com आणि/किंवा https://bankauctions.in/ येथे पुरविलेली लिंक https://www.kotak.com/en/bank-auctions.html येथे पुरविलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा.
**स्थळ : ठाणे, दिनांक : १३.०२.२०२५**
**प्राधिकृत अधिकारी,**
**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड करीता**

**चेस ब्राईट स्टील लि.**
सीआयएनः एल९९९९९एमएच१९५९पीएलसी०११४७९
नोंदणी कार्यालयः डी-११५, स्टील चेंबर, प्लॉट क्र.५१४, स्टील मार्केट कॉम्पलेक्स, कळंबोली-४१०२१८, महाराष्ट्र, भारत
मोबाः +९१ -२२-२७६०६६७९, फॅक्स : + ९१-२२-२७६९०६२७ ईमेलः info@chasebrightsteel@gmail.com
वेबसाईटः www.chasebrightsteel.com,
**३१.१२.२०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षासाठी लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण**
(रु. लाखात)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही ३१.०३.२०२४ | तारखेपर्यंत वर्षाची आकडेवारी ३१/१२/२०२४ | मागील वर्षांच्या संपलेली संबंधित ३ महिने ३१.१२.२०२३ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ४६.०३ | ५१.३८ | ६४.१८ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींपूर्वी) | -९.५५ | ११.९३ | -२१.५५ |
| ३ | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | -२१.५५ | ११.९३ | -२१.५५ |
| ४ | कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबींनंतर) | -२१.५५ | ११.९३ | -२१.५५ |
| ५ | कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी (करोत्तर) नफा/(तोटा) आणि अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून) | ६.९७ | ४.६० | -२१.५५ |
| ६ | समभाग भांडवल | १६७.५० | १६७.५० | १६७.५० |
| ७ | राखीव मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार (पुनर्मुल्यांकीत राखीव वगळून) | -१,५८६.२४ | -१,५८६.२४ | -१,६२१.१४ |
| ८ | प्रति भाग प्राप्ती (प्रत्येकी रु. १०/- चे) (अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी)- १. मूलभूत आणि २. सौम्यिकृत | -०.५७ | ०.४१ | -१.२९ |

**टीप:**
१. वरील माहिती म्हणजे सेबी (लिस्टिंग ॲण्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या तिमाही/वार्षिक वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा एक उतारा आहे. तिमाही/वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् आणि सूचीबध्द मंडळ (सादरीकरणाच्या युआरएल) www.bseindia.com आणि www.chasebright.com या वेबसाईटस्‌वर उपलब्ध आहे.
**मंडळाच्या वतीने व करिता**
**सही/-**
**अविनाश जजोदिया**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (डीआयएन ०००७४८८६)**
**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: १२ फेब्रुवारी, २०२५**